## CHANGE IN NAME

I **SANDRA CARDOZO**, r/o FLAT NO.S/1 KURTARKAR RESIDENCY BLDG B BORDA, MARGAO SALCETE, Goa, 403601, like to change my name from **SANDRA CARDOZO E FERNANDES** to **SANDRA CARDOZO**. Hereafter in all my dealings and documents I will be known by the name **SANDRA CARDOZO.**

## CHANGE OF NAME

I **Lavira Fernandes** flat no S1-190-7 Chodankar residency Aquem Baixo Margao Goa would like to correct my name from **Lavira Cruz Fernandes e Menezes** to **Lavira Fernandes** herein after in all my dealings and documents I will be known by my new name **Lavira Fernandes.**

**VILLAGE PANCHAYAT KHAJNE AMERE POROSCODEM**

Ref. No. VP / KAP / PER / QUT- NOT / 25-26 / 349

Date: 17/06/2025

**QUOTATION NOTICE**

The Sarpanch of this Village Panchayat Khajne Amere Poroscodem, Pernem, Goa, on behalf of V. P. Khajne Amere Poroscodem, invites the sealed quotation from the eligible supplier to supply the below mention material / item on or before 27.06.2025 upto 11.00 am. The particular of the material / item to be supplied is as under.

**1.** Supply of Bleaching Powder - Per Kg

The terms, conditions & other particulars of the quotation are as follows:

**1.** The quotations should reach the office on or before 27.06.2025 at 11.00 am **2.** Quotations will be opened on 28.06.2025 at 11.00 am **3.** rate per unit item should be quoted and lowest quotation is likely to be accepted. **4.** Incomplete quotation received and quotation received later on beyond the schedule time will not be considered. **5.** GST or any other taxes should be mentioned on the quotation **6.** Village Panchayat reserves the right to accept or reject any or all quotations received without assigning any reason thereof to the supplier

Seal

Sd/- (Sarpanch)

Village Panchayat Khajne Amere Poroscodem

**BEFORE THE JOINT MAMLATDAR IV OF BARDEZ TALUKA, MAPUSA, BARDEZ, GOA**

Mutation Case No: 101666, 101667 Village: Salvador do Mundo

1. U. T. Alok, r/o H. No. 499, Near Maringan Temple, Ecoxim, Salvador do Mundo, Bardez, Goa 403101 .....Applicant

V/s

1. Ganga Uttam Korgaonkar 2. Prabhavati Kalidas Sawant 3. U.T. Dinesh 4. Kalidas Subray Sawant ....Opponents

**PUBLIC NOTICE**

To all Opponents / Legal Heirs / any other interested parties

Whereas the applicant U. T. Alok, r/o H. No. 499, Near Maringan Temple, Ecoxim, Salvador do Mundo, Bardez, Goa 403101, has applied for mutation under Section 96 of L.R.C. 1968 to include his name in occupants column under Sy. No. 378/6 and 369/16 of Village Salvador do Mundo, after deleting the existing name of Kalidas Subray Sawant from occupant column as per Deed of Succession bearing No. 854 at pages 81 to 83 dated 19.07.2016 executed before office of Notary Ex-Officio, Bardez, Mapusa.

Whereas, the notices in Form no. X were sent to all the interested parties by registered Ad. However some A.D. cards returned back with postal remark party expired / party left / not known / address out of station" and he do not know the detailed addresses of the legal heirs and whereabouts of the interested parties.

And whereas, the applicant has prayed vide his application for substitute service, by publication of public notice in any one daily newspaper as required under Order V Rule 20(1A) of C.P.C. as the applicant does not know the legal heirs and the addresses of the interested parties.

All the interested parties are hereby given the notice of the said mutation entry and called upon to submit to me their objections if any to the mutation entry within 15 days from the date of publication of this notice failing which the suitable order under the provision of LRC shall be issued by the certifying officer.

Mapusa, Dated: 17/06/2025

Sd/- **Saiesh Naik**

Joint Mamlatdar VI of Bardez

Seal

H/c o Joint Mamlatdar IV of Bardez

Mapusa, Goa

**IN THE COURT OF JOINT MAMLATDAR - VI OF BARDEZ TALUKA AT MAPUSA**

**Case No.:**

**JM-VI/ MND/ DEC/ u/s.8A /Aldona /02/2025**

1.Smt. Amita Ankush Pednekar, Widow of Ankush Pednekar Age 67 years, Housewife, 2.Mr. Rajesh Ankush Pednekar Son of Ankush Pednekar Age 44 years, Married, service 3.Mr. Abhiject Ankush Pednekar Son of Ankush Pednekar (Since deceased through his legal heirs) a. Mrs. Ankita Abhijeet Pednekar Widow of Abhijeet Pednekar Age 42 years, Housewife, r/o H.No.1121, Lackdem, Carona, Aldona, Bardez Goa. 4. Mr. Priyesh Ankush Pednekar Son of Ankush Pednekar Age 39 years, married, service, All r/o H.No.1121, Lackdem, Carona, Aldona, Bardez Goa.

...Applicants

v/s

1.Lulu Minguel Rocha, Major of age, Landlord, r/o H.No.1114, Carona, Bardez Goa. 2.Geeta Ratnakar Chopdekar, Major of age, Landlady, r/o H.No.1123, Sonarbhat, Lackdem, Carona, Aldona, Barden Goa ...Opponents

**PUBLIC NOTICE**

To, The Opponents,

Whereas, the above named applicant has filed an application for declaration of Mundkar under Section 8A of Goa Daman & Diu Mundkar (Protection from Eviction) Act 1975 with respect to Survey No.252/1 and 252/3 of Aldona Village in Bardez Taluka.

And whereas the applicant vide his application filed on 08/04/2025 has submitted that the notices issued to the above opponent are not served although the said address are permanent addresses and has therefore prayed for publication of notice by way of substitute service.

And whereas in my opinion this is fit case for publication under order V Rule 20(1)(A) of C.P.C. 1908 to publish the notice through local newspaper for vide publicity.

Now therefore, in terms of provision of the order V Rule 20(1) (A) for C.P.C. 1908, the above opponents are hereby called upon to appear in this court on **07/07/2025 at 10.30 a.m.** to answer the claim of the applicant. Take notice that in default of your appearance as aforesaid on the above said date and time, the said application will be heard and determined in your absence

Given under my hand and the seal of this court on this 11th, day of June, 2025.

**SD/- ( Saiesh S. Naik )** SEAL

**Joint Mamlatdar VI of Bardez Taluka Mapusa Goa.**

# दांडोसवाडा मांद्रे रस्त्यावर पाणीच पाणी





मांद्रे दांडोस वाडा रस्त्यावर असलेले पाणी

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पेडणे, दि. १७ :** दांडोसवाडा मांद्रे येथील मुख्य रस्त्यावरील गटार व्यवस्था पूर्णपणे कोलमडून गेल्यामुळे रस्त्यावर पाण्याचे तलाव निर्माण झाले. या रस्त्यावरून वाहने चालवताना रस्त्याचा शोध घ्यावा लागतो. दुचाकी वाहन चालकांना तर बरीच कसरत करावी लागते. या रस्त्याच्या बाजूला जी गटार व्यवस्था आहे. ती गटार व्यवस्था पूर्ण पणे कोलमडून गेली आहे. ही गटारे पूर्ण पाण्याने भरल्यानंतर पूर्ण पाणी रस्त्यावरून खेळत असल्याचे चित्र दिसते. शिवाय रस्त्याच्या बाजूला जी घरे आहेत .त्यांच्या घराच्या अंगणात अंगणातून घरात गॅलरीमध्ये पाणी जात असल्याचे चित्र दिसते. स्थानिक नागरिकांनी वेळोवेळी मागणी करूनही याकडे सार्वजनिक बांधकाम खाते रस्ता विभागाचे अभियंते दुर्लक्ष करत असल्यामुळे नागरिकांनी तीव्र नाराची व्यक्त केली आहे.

सरकार दरवर्षी आपत्कालीन सेवे संदर्भात मान्सूनपूर्व कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करावी. अशा सूचना अधिकाऱ्यांना देतात. परंतु येरे माझ्या मागल्या प्रमाणे गटार व्यवस्थाच सोडा ,इतर मान्सून पूर्व कामेही पूर्ण झाली नाही. त्यामुळे दांडोसवाडा मांद्रे येथील रस्ता पाण्याखाली कसा गेलेला आहे ? हे चित्र दिसून येते.

**NOTICE**

My Husband **Late Rupesh Kerkar** was owning **Maruti Swift ZXI AGS Car** bearing **Reg. No. GA-06-F-5705.** After his death, I have applied to transfer the ownership into my name. Any member of the public, or any other Institution/ Bank objecting for such transfer, may send their objections along with documentary proof, to the **RTO, Vasco** or to me **within 15 days** time from today.

**Date: 17.06.2025**

Sd/-

**Mrs. Anuya Rupesh Kerkar**

**H. No. 148, Near Govt. High School, Headland Sada, Mormugao, South Goa 403804.**

*Sandeep Ads*

**PUBLIC NOTICE**

The public in general and NATIVIDADE FERNANDES, resident of Ponda-Goa, in particular, are hereby informed that the General Power of Attorney dated 22/02/2020, executed by my client Joaquim Santano Fernandes before the Notary of Ponda Taluka, Smt. Anita N. Khandeparkar registered under Sr. No. 3466/2020 on 22/02/2020 appointing NATIVIDADE FERNANDES, resident of Ponda as his Attorney, to act on his behalf in respect of Plot No. 20 in survey No. 158/2 of Village Candepar belonging to him, has been REVOKED by him in terms of Deed of Revocation of General Power of Attorney dated 16/06/2025 executed before the Notary of Ponda Taluka, Smt. Anita N. Khandeparkar and registered under Sr. No. 5723/2025 on 16/06/2025.

The public, banks, institutions or any other entity are cautioned not to deal with NATIVIDADE FERNANDES in respect of the said plot No. 20 in any manner whatsoever, and anyone doing the same shall do so entirely at his costs and consequences.

Sd/- **Anita N. Khandeparkar**

SEAL Advocate & Notary

Shop No. 2, Ground Floor, Taraangan, Next to Ponda Civil Court, Tisca-Ponda-Goa, 403 401

**BEFORE THE JOINT MAMLATDAR IV OF BARDEZ TALUKA, MAPUSA, BARDEZ, GOA**

Mutation Case No: 102145 Village: Salvador do Mundo

1. Shrinivas Ramanlal Sharma, r/o 765, sai Nagar, B. B. Borkar Road, Porvorim, Bardez, Goa .....Applicant

V/s

1. Ramanbhai Dahyabhai Valand ....Opponents

**PUBLIC NOTICE**

To all Opponents / Legal Heirs / any other interested parties

Whereas the applicant Shrinivas Ramanlal Sharma, r/o 765, sai Nagar, B. B. Borkar Road, Porvorim, Bardez, Goa, has applied for mutation under Section 96 of L.R.C. 1968 to include his name alongwith the names of Shirishkumar R. Sharma and Asha Ramanbhai Valand in occupants column under Sy. No. 92/1 of Village Salvador do Mundo, Taluka Bardez as per Will drawn on 12.08.2010 recorded at pages 95v to 96 of Book No. 280 executed before Civil Registrar cum Sub Registrar, Mapusa, Goa.

Whereas, the notices in Form no. X were sent to all the interested parties by registered Ad. However some A.D. cards returned back with postal remark party expired / party left / not known / address out of station" and he do not know the detailed addresses of the legal heirs and whereabouts of the interested parties.

And whereas, the applicant has prayed vide his application for substitute service, by publication of public notice in any one daily newspaper as required under Order V Rule 20(1A) of C.P.C. as the applicant does not know the legal heirs and the addresses of the interested parties.

All the interested parties are hereby given the notice of the said mutation entry and called upon to submit to me their objections if any to the mutation entry within 15 days from the date of publication of this notice failing which the suitable order under the provision of LRC shall be issued by the certifying officer.

Mapusa, Dated: 16/06/2025

Sd/- **Saiesh Naik**

Joint Mamlatdar VI of Bardez

Seal

H/c o Joint Mamlatdar IV of Bardez

Mapusa, Goa

Government of Goa

**OFFICE OF THE CIVIL REGISTRAR-CUM-SUB REGISTRAR, SALCETE**

Room No. 209, 2nd floor, Mathany Saldhana Administrative Complex, Margao-Goa. Office Tel. No. 9405864458 / Office Email: **crsrsalcete-rd.goa@nic.in**

**No: CR/SR/SAL/1813/2025** **Dated 02/06/2025**

**NOTICE**

Office of the Civil Registrar-cum-Sub Registrar and Special Notary, Salcete.

Shri. Kiran Harish Mesta, Jt. Civil Registrar-cum-Sub Registrar I & II and Special Notary in the said Judicial Division of Salcete, Margao.

In accordance with Section 346(11) of the Goa Succession Special Notaries and Inventory Proceedings Act 2012 it is hereby made public that by Deed of Declaration of Heirship dated 28/05/2025 duly recorded under Book No. 1730 at page 82 to 84 of the office, following is recorded:

Upon the death of Esperanca Joaquina Fernandes who was expired on 29th June 2016 at Cumborda Verna - Goa a deed of Sucession was executed on 20/3/2023 recorded at 33 to 35V book No. 1708 and thereafter her husband Antonio Filisto Braganca expired on 30th September 2023 without leaving any will or other disposition of his last wishes leaving behind their following children/heirs namely 1) Mrs. Betendita Braganca married to Mr. Alberto Fernandes, 2) Mr. Aleixo Braganca married to Mrs. Leocadia Shalini Fernandes 3) Mr. Jose Salvador Braganca married to Mrs. Mary Seqerira 4) Mr. Luciano Braganca married to Mrs. Milagrina Pereira. The said Luciano Braganca died on 12/12/2016, leaving behind his wife Milagrina Pereira, as his moiety sharer and his following children namely (a) Miss. Melesha Espy Braganca, Unmarried b) Miss. Leona Maria Braganca, Unmarried 5) Mrs. Milagrina Rosa Braganca married to Mr. Antonio Januario Fernandes 6) Mr. Fatima Braganca married to Mr. Agnele Anthony Silveira 7) Mr. Adolfo Bajulo Braganca married to Mrs. Edna Fernandes, as his "sole and universal heirs", there being no one else or no other person or heir who in terms of Law of Succession in force in this State of Goa may prefer the estate left by the deceased persons.

**Any person having objection to this deed may file in this office within one month from the date of its publication.**

Seal

Sd/-

(**Shri. Kiran Harish Mesta**)

Special Notary and Jt. Civil Registrar-cum-Sub-Registrar-I & II, Salcete Margao Goa.

*Sandeep Ads*

# 'आकाश' चा ऋषभ तळवडकर गोव्यात अव्वल

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. १७ :** देशातील आघाडीची परीक्षा पूर्व तयारी संस्था आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेड ( एईएसएल ) च्या मार्गदर्शनाने ऋषभ तळवडकर याने ' नीट यूजी – २०२५ ' या अत्यंत स्पर्धात्मक वैद्यकीय प्रवेश परीक्षेत ऑल इंडिया रँक ५७० प्राप्त करत राज्यात अव्वल स्थान मिळवले आहे. ही कामगिरी विद्यार्थ्याच्या चिकाटीचा, शिस्तबद्ध अभ्यासाचा आणि एईएसएल कडून मिळालेल्या दर्जेदार मार्गदर्शनाचा ठोस पुरावा आहे. ही परीक्षा नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए ) मार्फत घेतली जाते आणि आज याचे निकाल जाहीर करण्यात आले.

ऋषभ एईएसएल च्या क्लासरूम प्रोग्रामचा भाग होता, जो नीट परीक्षेसाठी विशेषतः डिझाइन करण्यात आला आहे. त्याने आपले यश एईएसएल ने दिलेल्या अभ्यासाची भक्कम पाया, विषयांची सखोल समज, आणि सातत्यपूर्ण व शिस्तबद्ध अभ्यासपद्धतीला दिले.

ऋषभ म्हणाला की, आकाशच्या मार्गदर्शनामुळेच मला हे यश मिळाले. अभ्यासक्रमाची रचना, तज्ज्ञ शिक्षकांचे शिकवणे आणि वैयक्तिक मार्गदर्शन यामुळे अवघड विषय सहज समजले. एईएसएल नसते तर ही कामगिरी शक्य नव्हती. '

एईएसएलचे प्रमुख शैक्षणिक व व्यावसायिक डॉ. एच. आर. राव यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, ' नीट यूजी – २०२५ ' मध्ये इतका चांगला निकाल मिळवणे हे अत्यंत कौतुकास्पद आहे. ही कामगिरी विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे, पालकांच्या पाठबळाचे आणि आमच्या शैक्षणिक पथकाच्या समर्पणाचे प्रतिबिंब आहे. आम्ही ऋषभचे मनःपूर्वक अभिनंदन करतो आणि त्याच्या वैद्यकीय कारकीर्दीसाठी शुभेच्छा देतो.




नीट परीक्षा दरवर्षी नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए ) तर्फे घेतली जाते. भारतातील वैद्यकीय, दंत आणि आयुष इत्यादी अभ्यासक्रमांसाठी प्रवेशासाठी ही एक पात्रता परीक्षा आहे. भारताबाहेर प्राथमिक वैद्यकीय शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीही ही परीक्षा आवश्यक आहे.

आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेड ही भारतातील आघाडीची चाचणी तयारी कंपनी आहे जी उच्च दर्जाच्या वैद्यकीय आणि अभियांत्रिकी प्रवेश परीक्षा आणि एनटीएसई आणि ऑलिंपियाड सारख्या स्पर्धात्मक परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी व्यापक आणि प्रभावी तयारी सेवा प्रदान करण्यात माहिर आहे.

एईएसएल कडे ४०० हून अधिक केंद्रांचे संपूर्ण भारतातील नेटवर्क आहे ज्यामध्ये ४००,००० हून अधिक विद्यार्थी सध्या नोंदणीकृत आहेत आणि गेल्या ३६ वर्षांत त्यांनी एक अतुलनीय बाजारपेठेतील स्थान आणि ब्रँड व्हॅल्यू स्थापित केली आहे. विद्यार्थ्यांची खरी क्षमता उघड करण्यासाठी आणि त्यांच्या शैक्षणिक प्रयत्नांमध्ये यश मिळविण्यासाठी ते उच्च दर्जाच्या चाचणी तयारी सेवा प्रदान करण्यासाठी वचनबद्ध आहे.

पान १ वरून

## म्हापशात फळे पिकवण्यासाठी चार चेंबर्स बांधणार

सर्वात मोठ्या घाऊक कृषी बाजारांपैकी एक असलेल्या या यार्डचे आधुनिकीकरण करण्याची गरजही यानिमित्ताने अधोरेखित झाली आहे.

गेल्या चार दशकांत व्यापारी वाढले असले तरी, बाजारपेठेतील पायाभूत सुविधा जुन्याच राहिल्या आहेत. सुमारे २१,हजार चौरस मीटरमध्ये पसरलेल्या या मार्केटमध्ये फळे, भाज्या, नारळ व इतर कृषी उत्पादनांचा मोठ्या प्रमाणात व्यापार होतो. येथे १०० हून अधिक व्यापारी व अनेक लघु विक्रेते कार्यरत आहेत.

हा प्रकल्प पूर्णत्वास गेल्यावर, फळांची गुणवत्ता, सुरक्षितता आणि सार्वजनिक आरोग्य संरक्षण याला हातभार लागणार असून, बाजारपेठेतील व्यापारासाठी ही एक सकारात्मक पायरी ठरणार आहे.

# योग अभ्यास व सकारात्मक विचार जीवनास लाभदायक



देसाईवाडा, आगोंद : योग विज्ञान शिबिराचे उद्‌घाटन करताना जितेंद्र आमशेकर. बाजूला विठोबा देसाई, सदानंद देसाई, नारायण देसाई व नवनाथ सावंत.

■ *टीम दैनिक हेराल्ड*

▶ मुख्याध्यापक जितेंद्र आमशेकर

▶ आगोंदेश्वर देवस्थानतर्फे ७ दिवशीय योग विज्ञान शिबिराला प्रारंभ

**आगोंद, दि. १७ :** सामुहिक योग शिबीराचे आयोजन देवस्थानतर्फे होणे ही कौतुकास्पद बाब आहे. योग अभ्यासामुळे तन,मन यांची शुद्धी होते. जीवनात नियमितता, तसेच सातत्य आवश्यक असते. सकारात्मक विचार व नियमित योग यामुळे मानवी जीवन आनंदमयी होते. त्यामुळे माता, भगिनींनी स्वत:सह आपल्या पाल्यांना ही सवय लावावी,यांचे दुरगामी परिणाम दिसून येईल. असे प्रतिपादन लोलयें येथील श्री दामोदर विद्यालयाचे मुख्याध्यापक व समाजसेवेचे अग्रणी जितेंद्र आमशेकर यांनी केले.

आगोंद, येथील देसाईवाडा आगोंद स्पोर्ट्स क्लबच्या सभागृहात श्री आगोंदेश्वर देवस्थानतर्फे योग विज्ञान ७ दिवशीय शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे त्यानिमित्त काल दि.१४ रोजी, उद्घाटन कार्यक्रमात श्री आमशेकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन करीत होते.

यावेळी व्यासपीठावर त्यांच्यासह, निवृत्त सरकारी अधिकारी व स्थानिक जेष्ठ नागरिक सदानंद अ. देसाई. मल्लिकार्जुन देवस्थानचे माजी अध्यक्ष व श्री आगोंदेश्वर देवस्थानचे विद्यमान सचिव विठोबा म. देसाई, स्थानिक सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार नारायण देसाई, योग गुरू नवनाथ सावंत आदी उपस्थित होते.

सुरुवातीला सर्व मान्यवरांचे व उपस्थितांचे नवनाथ सावंत यांनी स्वागत केले. सौ. मंदा महेश गावकर, सौ. नवनीत नवनाथ नाईक गावकर यांनी व्यासपीठावरील मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. प्रमुख पाहुणे व अन्य मान्यवर यांच्याहस्ते समई प्रज्वलित करून शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. व्यासपीठावरील उपस्थित मान्यवर मंडळींचा परिचय अमिता शाबा देसाई यांनी करून दिला.

सामान्य जीवन सुखमय होते. जगाचा निर्मिता स्वयं योगी असून योग अभ्यासामुळे ऊर्जा व शक्ती वाढते. रोग नष्ट होतात, मनातील घृणा, द्वेष, मत्सर नाहिसे होतात. असे विठोबा देसाई यांनी आपल्या अभ्यासपूर्ण भाषणात सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हर्षा शरद नाईक गावकर तर नारायण देसाई यांनी सर्व उपस्थितांचे आभार व्यक्त केले. त्यानंतर योग गुरू नवनाथ सावंत यांनी योग प्रशिक्षणार्थ्यासाठी योग प्रात्यक्षिके सादर केली. हे योग विज्ञान शिबिर काल रोजी पासून दि. २१ रोजी संध्याकाळी ६ ते ७.३० पर्यंत मोफत चालणार आहे. या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन देवस्थान समितीतर्फे करण्यात आले आहे. दि. २१ रोजी समारोप कार्यक्रमाला सभापती रमेश तवडकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

# जिद्द व चिकाटिच्या जोरावर विद्यार्थ्यांनी यश संपादन करावे

## सिताराम गावडे | बांदा मराठा समाजाचा विद्यार्थी गुणगौरव सोहळा उत्साहात

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**बांदा दि. १५ :** जिद्द व चिकाटीच्या जोरावर विद्यार्थ्यांनी आपले यश संपादन करून जीवनात यशस्वी झाले पाहिजे आजच्या शैक्षणिक स्पर्धेत टिकण्यासाठी कठोर परिश्रम व मेहनत घेतली पाहिजे आज शिक्षणासाठी अनेक पर्याय तुमच्यासमोर उपलब्ध आहेत याचं संधीचा फायदा घेत आपण पुढील शैक्षणिक जीवनात यशस्वी व्हाल असे मत रोटरी क्लब बांदा चे अध्यक्ष सिताराम गावडे यांनी बांदा मराठा समाज विद्यार्थी गुणगौरव कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले. ज्या विद्यार्थ्यांची पुढील शिक्षण घेण्यासाठी आर्थिक परिस्थिती बेताची असेल त्यांना सुद्धा शैक्षणिक कर्ज सुविधा आज उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे उद्योग सुरू करणाऱ्या युवकांना सुद्धा व्यावसायिक कर्ज सुविधा आहेत यासाठी आपण केव्हाही सहकार्य करण्यास तत्पर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी व्यासपीठावर उद्योजक नारायण गावडे, उद्योजक आनंद गवस, देवस्थान समिती बांदा अध्यक्ष राजाराम उर्फ बाळू सावंत, बांदा



बांदा : मराठा समाज विद्यार्थी गुणगौरव कार्यक्रमात गौरव प्राप्त विद्यार्थ्यांसोबत मान्यवर.

मराठा समाज मुख्य प्रवर्तक गुरूनाथ सावंत, मराठा समाज माजी सचिव म.गो. सावंत, माजी सरपंच दिपक सावंत, महिला मराठा अध्यक्ष स्वाती सावंत, बांदा मराठा समाज अध्यक्ष विराज परब, आदि मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी बांदा मराठा समाज भुषण पुरस्कार यशस्वी उद्योजक नारायण गावडे व यशस्वी उद्योजिका अक्षता आनंद गवस यांना मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्हे, सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच यावर्षी पत्रकार संघाचे पुरस्कार प्राप्त पत्रकार प्रविण परब, विश्वनाथ नाईक, अजित दळवी यांना सुद्धा बांदा मराठा समाज यांच्या वतीने शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

सत्काराला उत्तर देताना नारायण गावडे म्हणाले मी सुरुवातीला व्यवसाय सुरू करण्यासाठी खुप मेहनत घेतली. शेजारच्या गोवा राज्यांत एस.टी ने प्रवास करत व्यवसायासाठी खुप प्रयत्न केला पण जिद्द सोडली नाही. घरात व्यवसाची अशी कोणतीच पार्श्वभूमी नव्हती तसेच घरची परिस्थिती बेताची होती याच परिस्थितीमधून मार्गक्रमण करून मी आज या यशापर्यंत पोहचलो उपस्थित विद्यार्थ्यांना संदेश देत तुम्ही सुद्धा तुमच्या पुढील जीवनात कठोर परिश्रम घ्याल तर नक्कीच यशस्वी व्हाल असे मत स्पष्ट केले.

यशस्वी उद्योजिका अक्षता गवस यांनी सुद्धा आपल्या मनोगतातून सांगितले की मला पुढे जाण्यास खरा पाठींबा दिला तो आपल्या पती ने अनेकदा त्यांचा सल्ला घेऊन मी त्यांना त्यांच्या व्यवसायात मदत करत होती. आणि आज मी स्वतः व्यवसाय या अनुभवातून चालवत आहे. मराठा समाज्याने दिलेल्या पुरस्काराबद्दल त्यांनी मंडळाचे बोलताना आभार व्यक्त केले.

मराठा समाज माजी अध्यक्ष राजाराम उर्फ बाळू सावंत यांनी सांगितले की गेली अनेक वर्षे बांदा मराठा समाज अनेक उपक्रम मराठा समाजासाठी राबवत आहे. यामध्ये क्रांती मोर्चा यशस्वी सहभागी, पुरग्रस्तांसाठी मदत, मराठा दाखला, आरोग्य शिबिर, विद्यार्थी गुणगौरव कार्यक्रम असे अनेक उपक्रम आम्ही मंडळाच्या वतीने करत आहोत. यावर्षी दहावी ,बारावी यशस्वी विद्यार्थ्यांसाठी गुणगौरव कार्यक्रम छान पद्धतीने आयोजित केला आहे. विद्यार्थ्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी सावंत यांनी शुभेच्छा दिल्या.

यावेळी दहावी व बारावी उत्तीर्ण झालेल्या पंचक्रोशीतील हायस्कूल मधील पहीले तीन क्रमांक,नव्वद टक्के मिळालेले विद्यार्थी, यांना भेटवस्तू, गुलाबपुष्प देऊन गौरविण्यात आले. तसेच विशेष पदवी प्राप्त एम.बी.बी.एस. मानसी सावंत, बी.एच.एम.एस. मिताली सावंत,मास्टर डिग्री आर्यलँड युनिव्हर्सिटी प्राप्त अंकीता पंडित, एम.एस.सी.गोल्ड अंजली सावंत, यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना कोकण कला व शिक्षण विकास संस्थेकडून स्कूल किटसाठी सहकार्य लाभले. गौरवण्यात आलेल्या विद्यार्थ्यांमध्ये इयत्ता दहावी आर्यन गावडे, तन्वी ठीकार, श्रेया सावंत, लक्ष्मण सावंत, आर्या सावंत, संस्कृती गवस, शर्वरी ठाकूर, सृष्टी ठाकूर, भावेश देसाई, संचिता गवस,ओम परब, श्रेयस दळवी, रेश्मा पालव, जितेश पोपकर, भ्रुंजल गावडे, सोहम गावडे, वैष्णवी वाडकर, रिधिमा गावकर, आर्या मुळीक, श्रीशा सावंत, कृपा वारंग, श्रद्धा गावडे, गीतांजली देसाई,दत्ताराम भिसे, वैष्णवी गवस, हर्षद राणे, रिद्धी मडुरकर, श्रावणी गावडे, पूजा सावंत, संचिता सावंत,अदिती परब, इयत्ता बारावी गौरी नाईक,कस्तुरी सावंत, तनिष्का सावंत, मानसी देसाई, मयुरी गावडे, तनुजा देसाई,शर्वा मोरजकर, महिमा सावंत, श्रीधर कोठावळे, राखी पंडित, सदाशिव गावडे, रोहन दळवी, प्रथमेश शेगडे गौतमी मुळीक, रुचिता सावंत, वेदांग वारंग, अथर्व राणे, चारुशीला कानसे,

यावेळी सचिव आनंद वसकर, सहसचिव हेमंत मोर्ये, खजिनदार महेश मोर्ये, माजी अध्यक्ष निलेश मोरजकर, श्याम गवस, लवू रेडकर, ग्रा.सदस्य रत्नाकर आगलावे, बांदा मराठा प्रसिद्धी प्रमुख राकेश परब,विकि कदम,माधवी गाड, राखी कळंगुटकर,ममता सावंत,अवंतिका पंडीत, रिना मोरजकर, लता रेडकर, स्मिता परब, सुचिता धुरी, नीलेश कदम, अशोक परब आदी पदाधिकारी व मराठा बांधव उपस्थित होते.